# प्रेसनोट

दि. २०/०४/२०२६

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत मोफत उपचार मिळणे बंधनकारक असताना, तक्रारदार यांच्या आईच्या पायाच्या शस्त्रक्रिया करण्यासाठी लाचेची मागणी करणाऱ्या मंगळवेढा येथील खाजगी डॉ. अरूणकुमार महिंद्रकर व हॉस्पिटलमध्ये महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेचे काम पाहणारे आरोग्य मित्र सोमनाथ इंगळे यांच्याविरूध्द मंगळवेढा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल.

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** | सोलापूर युनिट, पुणे परिक्षेत्र. |
| **पोलीस ठाणे/गुन्हा नोंदक्रमांक** | मंगळवेढा पोलीस ठाणे, सोलापूर ग्रामीण. गुन्हा रजिस्टर क्र. २९४/२०२६ |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा कलम ७ व १२ प्रमाणे. |
| **आरोपीचे नाव व कार्यालय** | १) डॉ. अरूणकुमार महिंद्रकर, वय- अंदाजे ४५ वर्षे, पद- खाजगी डॉक्टर, नेमणुक- मंगळवेढा मल्टिस्पेशालीटी हॉस्पिटल, मंगळवेढा<br>२) सोमनाथ इंगळे, वय - अंदाजे ३८ वर्षे, पद- आरोग्य मित्र, नेमणुक- मंगळवेढा मल्टिस्पेशालीटी हॉस्पिटल, मंगळवेढा |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | १०,०००/- रू लाच मागणी करून तडजोडीअंती ५,०००/- रुपये. |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | निरंक (लाच मागणी) |
| **पडताळणी दिनांक** | पडताळणी कारवाई- २४/०३/२०२६ रोजी, |
| **सापळा दिनांक** | लाच मागणी |
| **सापळा अधिकारी** | श्री. रविंद्र लांभाते, पोलीस निरीक्षक, एसीबी, सोलापूर |
| **तपास अधिकारी** | श्री. प्रशांत चौगुले, पोलीस उपअधीक्षक, एसीबी, सोलापूर. |
| **थोडक्यात माहिती** | यातील तक्रारदार यांची ७२ वर्षीय आईचा पाय घसरून पडल्याने त्यांना मंगळवेढा येथील मंगळवेढा मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल (महिला हॉस्पिटल) येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. सदर हॉस्पिटलमधील डॉ.अरूणकुमार महिंद्रकर यांनी तक्रारदार यांच्या आईची तपासणी करून शस्त्रक्रिया करावी लागेल असे सांगितले. तक्रारदाराची आर्थिक परिस्थिती हालाखीची असल्याने त्यांनी शस्त्रक्रिया शासकीय योजनेतून (महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना) करण्याची विनंती केली. सदर योजनून उपचार मोफत करणे बंधनकारक असतानाही, डॉ. महिंद्रकर यांनी शस्त्रक्रियेसाठी १६,०००/- रूपयांची मागणी केली. त्यापैकी ६०००/- रूपये त्यांनी सुरूवातीला घेऊन शस्त्रक्रिया केली. शस्त्रक्रिया झाल्यानंतर डिस्चार्ज देण्याच्या बदल्यात त्यांनी उर्वरित १०,०००/- रूपयांची पुन्हा मागणी केली.<br>डॉ.महिंद्रकर यांनी शासकीय योजना राबविण्यासाठी पैशाची मागणी केल्याने सदर तक्रारीची पडताळणी दोन शासकीय पंचांच्या उपस्थितीत करण्यात आली. पडताळणी दरम्यान १) डॉ. अरूणकुमार महिंद्रकर, अंदाजे वय- ४५ वर्षे, पद- खाजगी डॉक्टर, नेमणुक- मंगळवेढा मल्टिस्पेशालीटी हॉस्पिटल, मंगळवेढा (महिला हॉस्पिटल) २) सोमनाथ इंगळे, अंदाजे वय – ३८ वर्षे, आरोग्य मित्र, नेमणुक- मंगळवेढा मल्टिस्पेशालीटी हॉस्पिटल, मंगळवेढा यांनी तक्रारदाराकडे १०,०००/- रू लाचेची मागणी करून तडजोडीअंती ५०००/- रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. |

**सदरची कारवाई श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपायुक्त/ पोलीस अधिक्षक, एसीबी पुणे मो.क्र ९८२३१६७१५४, श्री. अजित पाटील, अपर पोलीस अधीक्षक, एसीबी पुणे. मो.क्र ९०२९०३०५३०, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. प्रशांत चौगुले, पोलीस उपअधीक्षक, एसीबी सोलापूर. मो.क्र. ९८२३२२५४६५, रविंद्र लांभाते, पोलीस निरीक्षक, एसीबी, सोलापूर, पोलीस अंमलदार संतोष नरोटे, गजानन किणगी, श्रीराम घुगे, अक्षय श्रीराम, सर्व नेमणुक एसीबी सोलापूर यांनी केली.**

**लोकसेवक शासकीय अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देणेसाठी कायदेशीर फी व्यतरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर कार्यालयास संपर्क साधण्याचे आवाहन श्री. प्रशांत चौगुले, पोलीस उपअधीक्षक, एसीबी सोलापूर. मो.क्र. ९८२३२२५४६५ यांनी केले आहे.**

**संपर्क पत्ता-** पोलीस उपअधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, श्री छत्रपती शिवाजी महाराज रंगभवन चौक, सोलापूर.

**संकेतस्थळ-** www.acb.maharashtra.gov.in

**ई मेल-**www.acbwebmail@mahapolice.gov.in

**ऑनलाईन तक्रार ॲप-**acbmaharashtra.net

**टोल फ्री क्रमांक-** १०६४

**दुरध्वनी क्रमांक-** ०२१७-२३१२६६८

**व्हॉटसॲप क्रमांक-**९४०४००१०६४

सहा.पो.आयुक्त/पोलीस उप अधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर. सत्यमेव जयते

20/4/26

(प्रशांत चौगुले)
सहा. पोलीस आयुक्त / पोलीसउप अधीक्षक
ॲन्टीकरप्शन ब्युरो, सोलापूर